Re-Accredited by NAAC

सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळ,विद्यावाडी,धुळे संचलित

# कला व विज्ञान महिला महाविद्यालय

## शहादा, जि.नंदुरबार

वर्ष:२०२६-२७

# माहिती पत्रक







सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळ, विद्यावाडी, धुळे संचलित

# कला व विज्ञान महिला महाविद्यालय

## स्थळ : कर्मसाक्षी प्रेमचंद जाधव शैक्षणिक संकुल

शहादा, जि.नंदुरबार. पिनकोड - ४२५ ४०९

www.apjmcs.org

e-mail- mahilacollege.shahada@gmail.com

Mob. 9284092501

(उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न)

**NAAC Re-Accredited...**

उच्च व तंत्र शिक्षण-म.रा.मंत्रालयाच्या " जागर जाणिवांचा " उपक्रमांतर्गत जिल्ह्यातून प्रथम व विद्यापीठातून द्वितीय असे दोन राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त करणारे नंदुरबार जिल्ह्यातील एकमेव महाविद्यालय

# माहिती पत्रक

सन : २०२६ - २०२७

• प्राचार्य •

कला व विज्ञान महिला महाविद्यालय

शहादा, जि.नंदुरबार.



स्व.सोनामाई



कर्मसाक्षी स्व.नानासाहेब प्रेमचंद जाधव
संस्थापक प्रेरक



भारतज्योती मा.आशाताई प्रे.जाधव
संस्थापक अध्यक्षा

## सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळ,विद्यावाडी,धुळे

# कला व विज्ञान महिला महाविद्यालयाबद्दल थोडेसे....

ग्राम संस्कृती आणि शहरी सभ्यता अशा संमिश्र अनोख्या धाटणीचे शहादा शहर , तालुका व परिसरातील ग्रामीण भाग, वाड्यावस्त्या, पाडे अशा सर्व घटकांनी शिक्षणाची कास धरून पुढे यावे या मुख्य उद्देशाने,विविध स्तरातील महिलांच्या उच्च शिक्षणाची निकड लक्षात घेवून ते उभारण्यासाठी अहोरात्र परिश्रम करण्याची जिद्द व तळमळ या पार्श्वभूमीतून स्वतंत्र अनुदानप्राप्त कला व विज्ञान महिला महाविद्यालयाची निर्मिती सन १९९५ मध्ये शहादे शहरात करण्यात आली. सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळ, विद्यावाडी,धुळे संचलित कला व विज्ञान महिला महाविद्यालय,शहादा हे महिलांनी महिलांसाठी व महिलांच्या कल्याणार्थ चालविलेले महाविद्यालय असल्याने ***// विद्यावती शिलवतीच नारी //*** हे ब्रिद वाक्य घेवून असंख्य महिलांच्या उच्च शिक्षणाच्या आशा–आकांक्षांना मूर्त रूप मिळाले. अवघ्या काही काळातच एक नामवंत, उत्कृष्ठ शिक्षण देणारे महाविद्यालय म्हणून नावारूपास आले. शिक्षणाला शिस्त आणि गुणवत्तेची जोड देत विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास संस्थेच्या या महाविद्यालयातून साधला जातो.

शहादा बस स्टॅण्डच्या उत्तरेस फक्त पांच मिनिटांच्या पायी अंतरावर महिला महाविद्यालयाची भव्य वास्तू आहे. शहादा शहराच्या मध्यवर्ती भागात तालुक्याच्या व परिसरातील विद्यार्थिनींना उच्च शिक्षणाची सुविधा प्राप्त झाली असून पालक व विद्यार्थिनींचा वेळ, श्रम व पैसा वाचतो. या महाविद्यालयाने स्थापनेपासूनच गुणात्मक दर्जा वाढविण्यासह विद्यार्थिनीचा सर्वांगीण विकास,सद्विचार व सद्वर्तन आदी विकसित करण्याच्या दृष्टिने अथक प्रयत्न केले आहेत. महाविद्यालयाच्या देखण्या वास्तूत भरपूर सोईसुविधा आहेत.

- प्रशस्त आवार व आल्हाददायक शैक्षणिक वातावरण
- अध्यापनासाठी हवेशीर वर्गखोल्या
- खेळाडूंसाठी – जिमखानासह विस्तीर्ण क्रीडांगण
- विपुल क्रमिक पुस्तके, संदर्भ ग्रंथ विविध विषयांच्या संशोधन पत्रिका, मासिके, दै.वृत्तपत्रे,
- ई– लायब्ररी सुविधांसह उत्कृष्ट ग्रंथालय व प्रशस्त वाचनकक्षण
- महिला सक्षमीकरण व राष्ट्रसेवा यासाठी रा.से.योजना
- आत्मसंरक्षणासाठी – स्वयंसिद्धा युनिट
- व्यक्तीमत्व विकासासाठी – युवतीसभा
- अर्थाजनासाठी – कमवा व शिका योजना
- गुणवंत व आर्थिक दुर्बल घटकांसाठी–महाविद्यालय अंतर्गतआईसाहेब शिष्यवृत्ती योजना
- मागासवर्गीयांसाठी – भारत सरकार शिष्यवृत्ती योजना
- पारंपारिक व सांस्कृतिक ठेवा व आधुनिक कला जोपासण्यासाठी वैविध्यपूर्ण गॅदरिंग
- गुणवत्तांना प्रोत्साहनासाठी – आकर्षक पारितोषिके व बक्षिसे
- संगणकीय ज्ञान वर्धनासाठी –ऑनलाईन सराव परीक्षांचा अवलंब.
- शुद्ध पिण्याचे पाण्यासाठी वॉटर फिल्टर

सॅनिटरी वेंडिंगमशीनसह अनेक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असलेल्या या महाविद्यालयात ध्येयवादी प्राध्यापकवृंद मनमिळावू शिक्षकेतरवृंद व शिस्तप्रिय प्राचार्य या त्रिसुत्राची प्रचिती विद्यार्थिनींना नित्य अनुभवावयास येते.

सर्वसामान्य व विविध प्रवर्गातील विद्यार्थिनींच्या शैक्षणिक उन्नतीसाठी उच्च शिक्षणाची ही स्वतंत्र दालनाची सोय उपलब्ध होणे,हा विशाल दृष्टिकोन लाभलेले आदरणीय कर्मसाक्षी नानासाहेब प्रेमचंद जाधव आमच्या महिला महाविद्यालयाचे आधारस्तंभ व प्रेरणास्थान आहेत. महिला महाविद्यालयात शिकणाऱ्या व शिकून गेलेल्या सर्व विद्यार्थिनींना आपल्या लेकींचे प्रेम देणाऱ्या आदरणीय भारतज्योती श्रीमती आईसाहेब आशाताई प्रेमचंद जाधव या आमच्या महिला महाविद्यायाच्या संस्थापक अध्यक्षा असून आजवर त्यांनी सोनामाई शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली आहे. महाविद्यालयाच्या परिसरातच नव्हेतर परिसराबाहेर देखील विद्यार्थिनींची काळजी घेण्यात यावी अशी आग्रही भूमिका मांडणाऱ्या सौ. वर्षाताई संजय जाधव या संस्थेच्या सचिव पदाचा कार्यभार वैशिष्टपूर्ण योगदान देवून,चातुर्यपूर्ण व्यवस्थापन करत नियोजनबद्ध रितीने सांभाळत आहे. या सर्वांचा आस्थेवाईक दृष्टिकोन विद्यार्थिनींना उच्च शिक्षणासाठी प्रेरित करणारा आहे.म्हणूनच महिला महाविद्यालय आपला शैक्षणिक उन्नतीचा प्रवास जोमाने करीत असल्याचे स्पष्ट होते.

आपल्या कला महिला महाविद्यालयामध्ये सद्यस्थितीत कला आणि मानसनीति व सामाजिक शास्त्र विद्याशाखेतील मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व भूगोल हे विषय विशेष

स्तरावर ( Special Level ) शिकविले जातात. तर मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, गृह अर्थशास्त्र ,राज्यशास्त्र, भूगोल, इतिहास हे विषय सामान्य स्तरावर ( General Level) शिकविण्याची सोय आहे. अनिवार्य इंग्रजी पदवी स्तरावर प्रत्येक वर्षी निवडणे अगत्याचे आहे. मात्र अन्य विषयांमध्ये निवडीला संधी असते. प्रथम वर्षामध्ये वैकल्पिक विषय निवडण्याची संधी असते. द्वितीय वर्षामध्ये आवडीचा विशेष विषय निवडता येतो. तृतीय वर्षामध्ये द्वितीय वर्षाचेच विषय कायम राहतात. कारण द्वितीय व तृतीय वर्षाचा अभ्यासक्रमावर आधारीत पदवी प्रदान करण्यात येते.

## प्रवेशासाठी नियम व अटी

१. बारावीचा निकाल लागल्यानंतर दुसऱ्या दिवसापासूनच प्रथम वर्ष पदवीची प्रवेश प्रक्रिया सुरू होते दि. ३१ जुलै च्या आत प्रवेश दिला जाईल.

२. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचे परिपत्रक क्रमांक उमवि ४६ / २०१० दिनांक १० / ३ / २०१० अन्वये चालु शैक्षणिक वर्ष २०१० – ११ पासून प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष कला वर्गास सत्र पद्धत लागू करण्यात आलेली आहे.तसेच परिपत्रक क्र. उमवि / ७ – अ / १२९० / २०११ दि. १६ जून २०११ अन्वये चालू शै. १२ / १३ पासून तृतीय वर्ष कला वर्ग सत्र पद्धत लागू करण्यात आली आहे.

३. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींनी माहिती पत्रक काळजीपूर्वक वाचले पाहिजे. प्रवेशासाठी माहिती पत्रकासोबत छापील प्रवेश अर्ज व हमीपत्र व रॅगिंग प्रतिबंधक प्रतिज्ञापत्र माहिती भरून प्रवेश शुल्कासह कार्यालयात जमा करावेत. अपूर्ण अर्ज स्विकारले जाणार नाही.

४. प्रवेश घेतेवेळी विद्यार्थिनीने स्वतः हजर असणे आवश्यक आहे.

५. महाविद्यालयात प्रथमच प्रवेश घेतांना विद्यार्थिनींनी प्रवेश अर्जासोबत कागदपत्रे सादर करावीत.
   अ) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व तीन सत्यप्रती.
   ब) १२ वी परीक्षा पास झाल्याचे मूळ गुणपत्रक व तीन सत्यप्रती.
   क) मागासवर्गीय विद्यार्थिनींसाठी जातीच्या प्रमाणपत्राच्या तीन सत्यप्रती.
   ड) इ.१० वी च्या गुणपत्रकाच्या तीन सत्यप्रती.

६. महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थिनींनी पात्रता अर्जासोबत आवश्यक शुल्क व खालील कागदपत्रे महाविद्यालयात सादर करावयाची आहेत.
   अ) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व तीन सत्यप्रती.
   ब) १२ वी परीक्षा पास झाल्याचे मूळ गुणपत्रक व तीन सत्यप्रती.
   क) मागासवर्गीय विद्यर्थिनींसाठी जातीच्या प्रमाणपत्राच्या दोन सत्यप्रती.

ड) विद्यापीठ पात्रता अर्ज ( Eligibility Form ) ( आवश्यक शुल्क सह )

इ) स्थलांतर दाखला ( Migration Certificate )

ई) सद्‌वर्तनाचा दाखला ( Character Certificate ).

(सदर अर्ज महाविद्यालयाच्या कार्यालयात मिळेल.)

७. प्रथम वर्ष कला शाखेत ऑनलाईन प्रवेशाकरीता ई मेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक.

८. द्वितीय व तृतीय वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींनी अर्जासोबत मागील वर्षी दिलेल्या परीक्षेच्या गुणपत्रकाची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. द्वितीय व तृतीय वर्षात भूगोल विषय विशेष स्तरावर घेणाऱ्या विद्यार्थिनींना उमवि परिपत्रक क्रमांक १२४ / २००८ नुसार प्रवेश घेते वेळेस प्रयोगशाळा फी रू.२५० /– आकारण्यात येईल.

९. शासन निर्णय क्र.युजीसी / २००३ / (३३ / ०३ ) / १ विशि / – ४ दि. १६ एप्रिल २००३ अन्वये शैक्षणिक संस्था विनिमय प्राधिकरणाने महाविद्यालयासाठी ठरवून दिलेले शुल्क भरणे बंधनकारक राहील. उमवि परिपत्रक क्रमांक १२४ / २००८ नुसार प्रवेश शुल्क आकारण्यात येईल व ते पृष्ठ क्रमांक १६ वर आहे. ते काळजीपूर्वक माहित करून घ्यावे. विद्यापीठ अथवा शासनाने शुल्कामध्ये फेरबदल केल्यास विद्यार्थिनीला तसे कळविण्यात येईल.व जास्तीची रक्कम भरण्याचे बंधन विद्यार्थिनींवर राहील.

१०. शुल्क पूर्ण भरलेले नसलेल्या विद्यार्थीनींचा प्रवेश रद्द करणे, सत्र नामंजूर करणे अथवा परीक्षेस बसू न देणे या संबंधीचे संपूर्ण अधिकार प्राचार्यांना राहतील.

११. बेशिस्त वागणूक व गैरवर्तवणूक करणाऱ्या विद्यार्थीनींना प्रवेश नाकारण्याचा किंवा तिचा प्रवेश रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार प्राचार्यांना राहील.

१२ विद्यार्थिनींच्या पालकांकडून हमीपत्र भरून घेण्यात येईल.

## टिप –

१. प्रवेश घेतल्यानंतर शाळा सोडल्याचा दाखला / स्थलांतर दाखला ( L.C./ T.C. ) यांच्या मूळप्रती कोणत्याही कारणास्तव शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत परत केल्या जाणार नाहीत. म्हणून नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींनी शाळा सोडल्याचा दाखला / स्थलांतर दाखला ( L.C./ T.C. ) गुणपत्रकाच्या सत्यप्रती ( झेरॉक्स ) काढून त्या प्रमाणित करून ठेवणे आवश्यक आहे.

२. गुणपत्रकाची मुळप्रत १ ते १५ जानेवारी या कालावधीच्या आत परत केले जाईल.

३. प्रवेशाचे नियम व प्रवेशाची मुदत यामध्ये केलेले बदल सूचना फलकावर पहावे.

४. महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी विद्यार्थिनींनी आपला प्रवेश अर्ज स्वहस्ताक्षरात भरून माननीय
५. प्राचार्यांची स्वाक्षरी घेवून प्रवेश विभागात अर्ज जमा करावा.
विद्यार्थिनींनी दाखल केलेली कागदपत्रे खोटी असल्यास प्रवेश रद्द केला जाईल. तसेच पोष्टाने पाठविलेला प्रवेश अर्ज प्रवेशासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

## ६. शुल्क परताव्याबाबत –

उमवि जा.क्र. १२ / फी / २२७८ / २००३, दिनांक २९ / ७ / २००३ नुसार विद्यार्थिनींना त्यांनी प्रवेश रद्द केल्यास खालील नियमांप्रमाणे शुल्क परत करण्यात येईल.

अ) प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून १५ दिवसापर्यंत प्रवेश रद्द केल्यास विद्यार्थिनीने जमा केलेले संपूर्ण शुल्क परत करण्यात येईल.

ब) मात्र प्रवेश घेतल्याचा दिनांकापासून १५ दिवस ते ३० दिवस या कालावधीत प्रवेश रद्द केल्यावर फक्त शिक्षण शुल्क (Tuition Fee ) पूर्ण परत करण्यात येईल. इतर शुल्कातून २० टक्के रक्कम कपात करून उर्वरित रक्कम विद्यार्थिनीस परत करण्यात येईल.

क) प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून ३० दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास विद्यार्थिनीस कोणतीही रक्कम परत करण्यात येणार नाही.

## विद्यापीठाची पात्रता ( University Eligibility)

१. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात प्रथमच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची इ – सुविधा अंतर्गत पात्रता मिळविणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थिनीने संबंधीत महाविद्यालयातून ऑन लाईन पात्रता अर्ज निर्धारित वेळेत भरून कार्यालयात जमा करावे.यशावकाश पात्रता झाल्याचे विद्यार्थिनीस कळविण्यात येईल.

२. पात्रता मिळविण्यासाठी खालील कागदपत्रे पात्रता अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अ) मुळ गुणपत्रक ब) शाळा सोडल्याचा दाखला (**L.C.**) किंवा स्थलांतर दाखला ( **T.C.** ).इ. १० वी च्या गुणपत्रकाची छायांकित प्रत.

३. पात्रतेबाबत विद्यापीठाने काही अडचण निदर्शनास आणून दिली अगर अडचण निदर्शनास आणून दिली नाही तर विद्यार्थिनीची पात्रता व्हायला विलंब होतो. अगर पात्रता होत नाही. पात्रतेबाबतचे सर्वाधिकार विद्यापीठास असतात. त्यामुळे पात्रतेबाबतच्या गैरसोयीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

४. पात्रता मिळण्यासंदर्भात विद्यार्थिनींनी अतिशय जागरूक रहावे. कारण पात्रतेअभावी परीक्षेस बसणेस अडचण येते. किंवा विद्यापीठ संबंधीत विद्यार्थिनींचा परीक्षेचा निकाल

राखून ठेवते. म्हणून पात्रतेसंबंधात काही त्रुटी असल्यास विद्यापीठ महाविद्यालयास कळविते आणि महाविद्यालय तात्काळ त्यासंबंधीच्या सूचना सूचना फलकावर लावते. सूचना फलकावरील सूचना नेहमी वाचण्याची सवय असावी.

- अभ्यासेतर कार्यक्रमातील सहभागाबद्दल गुणदान योजना उमविच्या अध्यादेश १६३ अन्वये वादविवाद, नाट्यभिनय, मूकअभिनय, प्रौढशिक्षण, आंतरविद्यापीठ, आंतरराष्ट्रीय क्रीडा प्रकार आदींमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थिनींना १५ गुण अतिरिक्त देण्याची तरतूद आहे. रासेयो व अभ्यासेतर कार्यक्रमातील सहभागाबद्दल एकत्रित पणे कमाल १५ गुण देण्यात येतात.

## महाविद्यालयातील योजना

## राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.)

स्वावलंबन, सामुदायीक जीवन आणि राष्ट्रीय वृत्तीची जाणीव करून देण्यासाठी विद्यापीठ पातळीवर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम सुरू करण्यात आलेला आहे. महाविद्यालयास सन २०१६ पासून रासेयो एककास मान्यता मिळाली आहे. या योजनेत कमाल १५० विद्यार्थिनी भाग घेवू शकतात. राष्ट्रीयसेवा योजनेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थिनींना विद्यापीठाच्या अध्यादेश १६३ नुसार १० गुण देण्यात येतात. राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेश मिळविण्यासाठी प्रवेश अर्ज भरून घेतले जातात व महाविद्यालयाची विशेष समिती विद्यार्थिनींची मुलाखत घेवून अंतिम निवड करते.तसेच किमान दोन वर्ष नियमित एक विशेष हिवाळी शिबीरात सहभागी व्हावे लागेल यात ७५ विद्यार्थिनी सहभागी राहतील.

## कमवा व शिका योजना

गरीब, हुशार व होतकरू विद्यार्थिनी पैशाअभावी शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून व विद्यापीठामार्फत कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना सन २००६ – ०७ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार विद्यार्थिनींना त्यांच्या शैक्षणिक वेळापत्रकाच्या नंतरच्या वेळेत काम उपलब्ध करून देण्यात येते व त्याकरीता दरतासी मेहनताना विद्यापीठाच्या नियमानुसार अदा करण्यात येतो. या योजनेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थिनींना दिवसाला जास्तीत जास्त तीन तास काम दिले जाते. या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थिनींची निवड कमवा व शिका योजना समिती मार्फत केली जाते. या योजनेतील कामाचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

१) परिसर स्वच्छता,

२) वृक्षारोपन व संवर्धन

३) ग्रंथालयातील कामे,

४) कार्यालय / विभागातील कामे,

५) वाहन तळावरील वाहनांचे रक्षण,

६) झेरॉक्स / एस.टी.डी. / विद्यार्थी ग्राहक भांडार इत्यादी सारखी कामे,

७) वसतीगृह ८) अन्य कामे

कमवा व शिका योजनेत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थिनीला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येते. या योजनेत भाग घेवू ईच्छिणारी महाविद्यालयाची नियमित विद्यार्थिनी असणे आवश्यक आहे. ती गरीब, हुशार, होतकरू व गरजू असावी.

## भारतज्योती मा.आशाताई प्रेमचंद जाधव गुणवंत विद्यार्थिनी पुरस्कार योजना

चालु शैक्षणिक वर्ष २०१५ – १६ पासून महाविद्यालयाने संस्थेच्या अध्यक्षा माननीय भारतज्योती श्रीमती आशाताई प्रेमचंद जाधव यांच्या नावाने एक प्रोत्साहनपर ' गुणवंत विद्यार्थिनी ' पुरस्कार योजना सुरू केली आहे. त्याअंतर्गत प्रत्येक वर्गातून वार्षिक परीक्षेत गुणानुक्रमाने प्रथम तीन क्रमांकांत येणाऱ्या विद्यार्थिनींना प्रोत्साहनपर अर्थसहाय्य व पुरस्कार दिले जातील.

## एकलव्य विद्याधन योजना

ग्रामीण, आदिवासी शेतकरी व शेतमजूर वर्गातील विद्यार्थिनीच्या शिक्षणासाठी विद्यापीठाने एकलव्य विद्याधन योजना सन २००६ – ०७ पासून सुरू केली आहे. सदर योजनेनुसार विद्यार्थिनींना त्यांच्या कोर्स कालावधीकरीता एकूण खर्चाच्या ७० टक्के रक्कम विद्यापीठाच्या शिफारशीनुसार कर्ज स्वरूपात बँका उपलब्ध करून देतात. या कर्जाचा व्याजदर द.सा.द.शे. ११ टक्के असून सदरचे व्याज शिक्षण कालवधीपर्यंत प्रत्येक तिमाहीनुसार विद्यापीठ भरते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थिनींना महाविद्यालयामार्फत छापील अर्ज व आवश्यक मार्गदर्शन पुरविण्यात येते.

## भारत सरकार शिष्यवृत्ती व अन्य शिष्यवृत्ती

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जाती व इतर मागास वर्ग व विशेष मागास संवर्गातील विद्यार्थिनींना भारत सरकारची शिष्यवृत्ती व महाराष्ट्र शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती मिळते. तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षक, मागासवर्गातील पगारदार नोकरांच्या पाल्यांना व स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना मोफत शिक्षणाची सवलत देण्यात येते. ही सवलत मिळविण्यासाठी विद्यार्थिनींनी प्रवेश घेतल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत शिष्यवृत्ती अर्ज भरणे गजरेचे आहे. तसेच महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर शिष्यवृत्तीसाठी

सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा शहादा येथे खाते उघडण्यासाठी महाविद्यालयात संपर्क साधावा. जेणेकरून शिष्यवृत्ती आपल्या खात्यावर वेळेवर जमा करता येईल. ही सवलत मिळविण्यासाठी त्या त्या संवर्गातील पालकांचे उत्पन्न शासनाकडून निर्धारित करण्यात येते व त्याच्या सूचना, सूचना फलकावर लावण्यात येतात.

## शिष्यवृत्तीचे प्रकार

१. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

२. आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक, नागरी सेवेतील सरकारी कर्मचारी, निवृत्त सैनिक यांच्या पाल्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती.

३. खुली गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

४. स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना मोफत शिक्षण व सवलत.

५. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग या संवर्गातील पालकांच्या पाल्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती व मोफत शिक्षण व सवलत.

६. शारिरीक अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती.

७. अहिंदीभाषिक प्रांतातील विद्यार्थ्यांने हिंदी हा विषय पदवी स्तरावर विशेष स्तरावर निवडल्यास देण्यात येणारी शिष्यवृत्ती.

**शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या / फ्रि शिप योजनांकरीता शै.वर्ष २०२५ -२६ च्या प्रवेश प्रक्रिया माहिती पुस्तीकेत नमूद केलेल्या सूचना खालीलप्रमाणे**

१) प्रवेश निश्चित झालेल्या अनुसूचित जाती व विविध मागास प्रवर्गातील तसेच आर्थिक मागास प्रवर्गातील तसेच आर्थिक मागास प्रर्वगातील विद्यार्थ्यांनी राज्य शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध शिष्यवृत्त्या / फ्रिशिप इ.योजनांकरीता राज्य शासनाच्या https://mahadbt.maharashtra.gov.in/ या पोर्टलवर जाऊन योजनेच्या निकषानुसार ऑनलाईन अर्ज नोंदणीकृत करणे आवश्यक आहे.

२) ऑनलाईन शिष्यवृत्त्या / फ्रिशिप करीता विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेद्वारे निर्धारित केलेल्या महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांनी अंतिम प्रवेश घेतलेल्या तारखेपासून पुढील एक महिन्याच्या आत महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्त्या / फ्रिशिप इत्यादी करीता परिपूर्ण अर्ज करणे आवश्यक आहे.

माहितीपुस्तीकेमध्ये प्रसिद्ध करावयाच्या इंग्रजी मधील वरील दोन सूचना-

* Applicants from Scheduled Castes , Various Backward Classes and Economically Backward Classes who have secured and confirmed their final admissions can avail the benefit under State Government various Scholorship / Freeship schemes etc. by applying online through State Government https://mahadbt.maharashtra.gov.in/portal.

* For availing the prescribed benefit of schlorship / Freeship schemes , etc. the candidated must fulfill the scheme eligibility and submit online application through MahaDBT portal within One month from the date of securing final admission in the college/institution.

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र

नागरी सेवा व लष्करी सेवेत दाखल होण्याकरीता द्याव्या लागणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन मिळविण्यासाठी स्वतंत्रपणे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू केलेले आहे. त्याचबरोबर स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी ग्रंथालयात ग्रंथसंपदा उपलब्ध करून देण्यात येते.

## शैक्षणिक व सांस्कृतिक मंडळे

महाविद्यालयात युवतीसभा, वादविवाद मंडळ, वाङ्मय मंडळ, सांस्कृतिक कला मंडळ, उत्कर्ष मंडळ इ. मंडळे शैक्षणिक वर्षात कार्यरत असतात. त्याचबरोबर शैक्षणिक सहली सारखे कार्यक्रम आयोजिण्यात येतात.

## शारिरीक शिक्षण व खेळ

महाविद्यालयाच्या विस्तीर्ण मैदानावर तज्ज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ॲथेलेटिक्स, कबड्डी, खो – खो, व्हॉलीबॉल, फुटबॉल, क्रिकेट व बास्केटबॉल इ. देशी व विदेशी खेळ खेळण्याची व्यवस्था केलेली आहे. तसेच विद्यार्थिनीच्या बौद्धीक विकासाबरोबरच विविध खेळातून त्यांचे आरोग्य हित जोपासण्यासाठी तज्ज्ञ शिक्षक जातीने मार्गदर्शन करतात.

## पारितोषिके

विद्यापीठ परिक्षेत गुणवत्ता संपादन करून उत्तीर्ण होणाऱ्या सर्व विद्याशाखेतील प्रत्येक वर्गातील पहिल्या तीन क्रमांकांना, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थिनींना तसेच रा.से.यो. विभागात उत्तम काम करणाऱ्या स्वयंसेवकांना महाविद्यालयाच्या प्रमाणपत्रासह आकर्षक बक्षिसे व मानचिन्हे दिली जातात.

## वैद्यकिय तपासणी

विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे प्रथम वर्षात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना वैद्यकिय तपासणी करून घेणे बंधनकारक असून विहित नमुन्यातील अर्ज भरून देवून तपासणी करून घ्यावी. त्यासाठी योजनाबद्ध कार्य – आखणी करण्यात येऊन तसे विद्यार्थिनींना वेळीच अवगत करविण्यात येते.

## वर्ग प्रतिनिधी निवड

नवीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाप्रमाणे वर्गप्रतिनिधींची व विद्यापीठ प्रतिनिधींची निवड केली जाईल.

## ओळखपत्र

महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी कोरे ओळखपत्र घेवून स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो लावून आवश्यक माहिती भरावी. त्यावर प्राचार्यांची सही २० ऑगस्ट च्या आत घेणे आवश्यक आहे. महाविद्यालयाच्या आवारात ओळखपत्र सतत जवळ असलेच पाहिजे. परीक्षेच्या वेळी, ग्रंथालयात व महाविद्यालयातील विविध कार्यक्रमांना ओळखपत्राशिवाय प्रवेश मिळणार नाही. विद्यार्थिनींनी याची नोंद घ्यावी. तसेच ओळखपत्र हरविल्यास अगर त्याचा गैरवापर झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी विद्यार्थिनींवर राहील. ओळखपत्र हरविल्यास नवीन ओळखपत्रासाठी अर्ज करून व रू. २५ /– भरून कार्यालयातून मिळू शकेल.

## उपस्थितीसंबंधीचे नियम

१. प्रत्येक विद्यार्थिनीने वेळेवर व नियमितपणे सर्व विषयांच्या तासांना भूगोल विषयाच्या विद्यार्थिनींना प्रयोगशाळेत उपस्थित राहणे अनिवार्य राहील.

२. केवळ महाविद्यालयात नाव घातले म्हणजे सत्र मंजूर होत नाही. त्यासाठी सर्व तासांना ८० टक्के उपस्थिती, परीक्षेतील समाधानकारक प्रगती, अभ्यासेतर कार्यक्रमात सहभाग इ. गोष्टी आवश्यक आहेत.

३. सतत गैरहजर राहणाऱ्या विद्यार्थिनींची टर्म मंजूर केली जाणार नाही. परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे पाठविला जाणार नाही व विद्यार्थिनीस परीक्षेस बसू दिले जाणार नाही याची पालकांनी नोंद घ्यावी.

४. प्रत्येक सत्रात घेण्यात येणाऱ्या सर्व चाचणी परीक्षांना विद्यार्थिनींची उपस्थिती अनिवार्य राहील.

५. महाविद्यालयातील प्रवेशीत सर्व विद्यार्थिनींनी विद्यापीठाच्या व महाविद्यालयाच्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

६. प्रत्येक विद्यार्थिनींने ओळखपत्र सदैव जवळ बाळगले पाहिजे. जबाबदार व्यक्तीकडून जेव्हा मागणी केली जाईल तेव्हा ओळखपत्र दाखविणे विद्यार्थिनींवर बंधनकारक राहील.

७. विद्यार्थिनींचा पोशाख निट – नेटका असावा व शिक्षक व शिक्षकेत्तरांशी तिची वागणूक सौजन्यशिल व मर्यादेची असावी.

८. विद्यार्थिनींनी वर्ग सुरू असतांना महाविद्यालयाच्या व्हरांड्यात किंवा आवारात रेंगाळू नये. त्याऐवजी ग्रंथालयात वाचन करावे.

९. विद्यार्थिनींनी शिस्त व प्रतिष्ठा यांना बाधा आणणारे व इतरांना त्रासदायक ठरणारे कोणतेही गैरवर्तन महाविद्यालयात व बाहेर करता कामा नये.

१०. महाविद्यालयाच्या इमारतीवर, बाकांवर किंवा फळ्यांवर कोणताही मजकूर लिहू नये. किंवा पोस्टर्स लावू नयेत. असे केल्यास कठोर शिक्षा केली जाईल.

११. महाविद्यालयातील कोणत्याही मालमत्तेची हानी न होवू देण्याची व ती सुव्यवस्थीत राखण्याची जबाबदारी विद्यार्थिनीची आहे.

१२. गटबाजी करणे, गोंधळ करणे, भांडण करणे याबाबींची गांभीर्याने दखल घेतली जाईल. संबंधीतांवर याबाबतीत कठोर कारवाई केली जाईल. तसेच प्राचार्यांच्या पूर्वपरवानगीशिवाय महाविद्यालयात कोणतेही मंडळ अथवा संस्था स्थापन करता येणार नाही. अथवा पाहुण्यांना आणता येणार नाही. याची विद्यार्थिनींनी नोंद घ्यावी.

१३. महाविद्यालयाच्या आवारात पान, तंबाखू , पानमसाला व धुम्रपानास सक्त मनाई आहे. असे वर्तन करणाऱ्या विद्यार्थिनींवर कडक कारवाई केली जाईल.

१४. हिंसक अशा जातीय, धार्मीक, भाषिक व राजकिय चळवळीत भाग घेणे तसेच पूर्व परवानगीशिवाय महाविद्यालयासंबंधीची माहिती वृत्तपत्रांना देणे इ. गोष्टी शिस्तभंगाच्या समजल्या जातील. याची विद्यार्थिनींनी गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी.

१५. विद्यापीठ / महाविद्यालयाने तयार केलेल्या सूचना व नियम त्या नियमात वेळोवेळी होणाऱ्या दुरूस्त्या माहित करून घेणे विद्यार्थिनींवर बंधनकारक राहिल.ह्या माहितीपत्रकात सर्वसाधारण माहिती दिलेली आहे. एखाद्या परिपत्रकात आलेली संपूर्ण माहिती सर्व अटींसह देता येणे शक्य नसते. त्यामुळे संबंधीत परिपत्रकानुसार संपूर्ण माहिती मिळविणे आवश्यक आहे. पूर्वीच्या परिपत्रकांना आलेल्या दुरूस्त्याबाबतही माहिती घेणे आवश्यक आहे.

## ग्रंथालयाचे नियम

१. विद्यार्थिनींनी ग्रंथालयाची पुस्तके घरी नेण्यासाठी नियमाप्रमाणे सभासद व्हावे. यासाठी प्रवेश पावतीत ग्रंथालय डिपॉझिट भरल्याचा स्पष्ट उल्लेख केलेला असावा व मा.

प्राचार्यांनी साक्षांकित केलेले ओळखपत्र त्याच्या सोबत असणे आवश्यक आहे.

२. सभासद विद्यार्थिनींनी पुस्तकांची देवाण – घेवाण करण्यासाठी ओळखपत्र सोबत आणावे. त्याशिवाय पुस्तकांची देवाण – घेवाण होणार नाही तसेच एका सभासदास दुसऱ्या सभासदाचे ओळखपत्र वापरता येणार नाही.

३. ग्रंथालयातील पुस्तके काळजीपूर्वक वापरून ती दिलेल्या तारखेस / वेळेवर जमा केली पाहिजेत. दिलेल्या तारखेनंतर पुस्तक आणल्यास प्रती दिवसाला २ रूपये प्रमाणे विलंब दंड आकारला जाईल.

४. पुस्तक व विलंब दंड दिल्याशिवाय पुढील पुस्तके दिली जाणार नाहीत. पुस्तक हरविल्यास पुस्तकाची पाचपट किंमत भरावी लागेल.

५. मागणीपत्र एक दिवस आधी पूर्ण नोंदी करून ग्रंथालयातील पेटीत टाकणे आवश्यक आहे.

६. ग्रंथालयातून पुस्तक नेतांना त्यांची पाने तपासून घ्यावीत. पुस्तकात काहीही लिहू नये किंवा खुणा करू नयेत. पुस्तकांची पाने फाडणाऱ्या विद्यार्थिनींवर सक्त कारवाई केली जाईल.

७. ग्रंथालयात पुस्तक देवाण – घेवाण करतांना शांतता पाळावी. विद्यार्थिनींना अभ्यासासाठी एकावेळी एकच पुस्तक केवळ सतत सात दिवसांसाठी वापरता येईल.

८. विद्यार्थिनी सभासदांनी ग्रंथालयासंबंधी सर्व दंडाच्या पावत्या, डिपॉझिट व फी च्या सर्व पावत्या तसेच नो डयूज दाखला महाविद्यालय सोडेपर्यंत जवळ ठेवणे आवश्यक आहे.

९. ओळखपत्राशिवाय नो डयूज प्रमाणपत्र मिळणार नाही.

१०. वाचन कक्षाचा लाभ घेण्याकरीता ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे.

११. ग्रंथालयामध्ये नवीन पुस्तके ( New Arrival ) करीता स्वतंत्र कपाट / खण आहे. तेथील पुस्तके ग्रंथ पाहतांना / हाताळतांना काळजी घ्यावी.

## पालकांना विनंती

१. या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींच्या पालकांनी आपल्या पाल्यांच्या अभ्यासाबाबत जागरूक असावे अशी त्यांना नम्र विनंती आहे. विद्यार्थिनींची हजेरी,वर्तवणूक, परीक्षेचा निकाल, अभ्यास याबाबत पालकांना माहिती कळविण्याचा प्राचार्य प्रयत्न करीत असतात. परंतु खालील गोष्टींच्या संदर्भात पालकांचे सक्रीय सहकार्य अपेक्षीत आहे.

२. परीक्षेच्या निकालाचे कार्डस् आपणांस वेळेवर मिळत असल्याबद्दल पालकांनी दक्षता बाळगावी.

३. सर्व परीक्षांना व गृहपाठांना आपली पाल्य बसत आहे याची पालकांनी खात्री करून घ्यावी. जर पाल्य परीक्षेला बसू शकली नाही किंवा गृहपाठ वेळेवर देवू शकली नाही तर योग्य कारणांसाठी असे घडल्याबद्दल पालकांने त्वरीत महाविद्यालयाशी संपर्क साधून त्याबाबत खात्री करून घ्यावी.

मा.प्राचार्यांकडून पाल्याच्या वर्तणूकीबाबत काही पत्र आल्यास पालकांनी त्याची गंभीर दखल घ्यावी. आवश्यकता
४. वाटल्यास आधी कळवून त्यांनी व्यक्तिशः येवून प्राचार्यांची भेट घ्यावी.

महाविद्यालयात पुष्कळदा पाल्याचा अभ्यास कशा पद्धतीने चाललेला आहे याची
५. पालकांना कल्पना नसते. पाल्याचा वर्गातील अभ्यास व परीक्षेतील निकाल अथवा तिची वर्तणुक यामुळे त्याबद्दल प्राचार्यांना काहीवेळी कडक उपाय योजना करणे भाग पडते. सर्व परिस्थिती आवाक्याबाहेर गेल्यावर पालकांना तिची कल्पना येते. त्यामुळे सर्वांनात्रास भोगावा लागतो. म्हणून पालकांनी प्राचार्यांबरोबर सतत संपर्क ठेवणे आवश्यक आहे.

केवळ परीक्षा शुल्क भरणे म्हणजे पाल्यास सत्र मान्यता ( Grant of Term )मिळाली
६. असे होत नाही. याची विद्यार्थिनींनी व पालकांनी नोंद घ्यावी.

## विशेष सूचना

विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र. एफ – १ – ८ / २००६ (सीपीपी – २ ) दि. ४ मार्च २००८ अन्वये सर्वोच्च न्यायालयाने शैक्षणिक संस्थांमधील रॅगिंग विरूद्ध निर्णय दिला आहे. माहिती पत्रकात खालील प्रमाणे तो प्रसिद्ध करण्यास सांगितलेला आहे.

- **सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय –**

  " जर कोणत्याही शैक्षणिक संस्थेत रॅगिंग घटना घडल्याचे प्रशासनाच्या लक्षात आल्यास प्रशासनाधिकाऱ्याने रॅगिंग घडवून आणणाऱ्या विद्यार्थ्यास त्याचे म्हणणे मांडायची संधी द्यावी.जर त्याचे म्हणणे समाधानकारक वाटले नाही तर अशा विद्यार्थ्यास त्या शैक्षणिक संस्थेतून काढून टाकण्याचा अधिकार प्रशासनास राहील."

- आपले पत्र जा.क्र. उमवि / ११ ए / वेबसाईट / ३८/२०१७ दि. २० /०२/२०१७ अन्वये लष्करी,निमलष्करी तसेच पोलिस अधिकारी व जवानांच्या विधवा / पाल्यांना मोफत शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

१. राज्यसरकारचे जिल्हास्तरीय प्रथम व विद्यापीठस्तरीय द्वितीय २०१४ – १५ मध्ये असे दुहेरी पुरस्कार प्राप्त करणारे नंदुरबार जिल्ह्यातील एकमेव द्वितीय महाविद्यालय.
२. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी महाविद्यालयाची सुरक्षित–प्रशस्त इमारत
३. महाविद्यालय बसस्टॅण्ड पासून ५ मिनिटांच्या पायी अंतरावर.
४. भयमुक्त वातावरण (रॅगिंग – फ्री कॅम्पस)
५. समृद्ध ग्रंथालय व स्वतंत्र वाचन कक्ष.
६. प्रथम वर्षात विविध आठ विषयांमधून सामान्यस्तरावर निवड करण्यास संधी. (मराठी,हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल, गृह अर्थशास्त्र वैकल्पिक इंग्रजी )
७. द्वितीय वर्षापासून विविध पाच विषयांमधून विशेष स्तरावर निवड करण्याची संधी. (मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भूगोल)
८. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
९. विद्यार्थी कल्याण विभागातर्फे कमवा व शिका योजना – गरीब व होतकरू विद्यार्थिनींना अर्थसहाय्य.
१०. चालु वर्षापासून भारतज्योती सौ. आशाताई जाधव विद्यार्थिनी प्रोत्साहन अर्थसहाय्य योजना
११. उन्नती वर्ग (रेमेडियल कोचिंग क्लास)
१२. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना १५० विद्यार्थिनींचे नियमित युनिट
१३. युवती सभा, स्वयंसिद्धा अभियानाद्वारे विद्यार्थिनींच्या आत्मरक्षणा ची सिद्धता
१४. विस्तीर्ण क्रीडांगण व पुरेसे खेळ साहित्य
१५. विनम्र,सेवाभावी व क्रियाशील कर्मचारीवृंद व तज्ञ सहृदयी शिक्षक वृंद

---

**दृष्टि** – कला महिला महाविद्यालय स्वत:ला उच्च शिक्षणाच्या सागराचा एक छोटा पडाव समजते आणि महिलांना पदवीधर करतांना आपण सामाजिक न्यायासाठी बांधील आहोत असे मानते.

**जीवित कार्य** – महिलांनी सामाजिक बंधनातून मुक्त व्हावे याकरीता त्यांच्या दृष्टिकोनाला व वर्तनाला उच्च शिक्षणाच्या माध्यमातून आकार देणे.

**उद्दिष्ट** – १. महिलांना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणणे.
२. विद्यार्थिनींच्या सर्वांगिण विकासासाठी वातावरण तयार करणे.
३. सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि राष्ट्रीय कार्यामध्ये शिक्षणाद्वारे महिलांचा सहभाग वाढविणे.

**ध्येये** – १. आमचे प्रमुख ध्येय सामाजिक न्याय हे असल्याने समाजातील महिलांच्या दुय्यम भुमिके विरूद्ध न्याय मागण्यास विद्यार्थिनींना प्रेरीत करणे.
२. जागतिक अपेक्षा आणि ग्रामीण जाणीवा यांच्यातील दरी मिटवणे .
३. भारताचे भवितव्य उज्वल व समृद्ध करण्याच्या राष्ट्रीय कार्यात युवतींना योग्य शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम करून आपला सहभाग नोंदविण्यास उद्युक्त करणे.
४. विद्यार्थिनींना भारताच्या विविधतेतून एकता या खास तत्वाबाबत संवेदनशिल बनविणे.
५. त्यांना भूतकालीन उदात्त विचार आणि उदयाला येणाऱ्या चांगल्या संकल्पना यांचा समन्वय साधण्यास प्रवृत्त करणे.

# कला शाखा प्रवेश

## संक्षिप्त रूप–प्रथम वर्ष (एफ.वाय.),द्वितीय वर्ष (एस.वाय.),तृतीय वर्ष (टी.वाय.)

## प्रथम वर्ष कला (सत्र १ आणि सत्र २)

## F.Y.B.A. Admission 2024 as per NEP-2020-Sem (I& II)

**FYBA Admission 2024 as per NEP-2020 - Sem (I & II) (2024-2025)**

| Group No. (Select any one Group) | Main Subjects | | | OE | AEC,VEC and IKS | CC |
|---|---|---|---|---|---|---|
| | M1/DSC-1 | M2/DSC-2 | M3/DSC-3 | | Sem-I | Sem-I |
| | Select any One Subject | Select any One Subject | Select any One Subject | Select any One Among the following (Sem-I& II) Science OE 114&124 1)Geography 2)Botany 3)Chemistry 4) Maths 5)Zoology 6)Physics 7) Computer Science | AEC-1:Eng-115 English for all-: Oral Communication VCE -1 : ES-115 Environmental studies IKS: 115 भारतीय ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व कला | Select any One- CC-117 A) NCC -1 B) NSS - 1 C) Sports - 1 D) Cultural Activities - 1 E) IPDC – 1 F) Student Welfare Activities – 1 G)Yoga |
| Group 1 | Marathi | Political Science | Political Science | | | |
| | Hindi | Geography | Geography | | | |
| | English | Economics | Economics | | | |
| | – | History | History | | | |
| | – | Home-Economics | Home-Economics | | | |
| Group- 2 | Marathi | Marathi | Political Science | | Sem-II | Sem-II |
| | Hindi | Hindi | Geography | | AEC-2:Eng125 English for all-: Written Communication VCE -2 :CI-125 Constitution of India | Select any One CC-127 A) NCC -2 B) NSS - 2 C)Sports - 2 D) Cultural Activities-2 E) IPDC – 2 F) Student Welfare Activities – 1 G)Human Rights and Environmental Law – 2 |
| | English | English | Economics | | | |
| | – | – | History | | | |
| | – | – | Home-Economics | | | |
| Note: Any one of the above subjects should be Selected only once. | | | | | | |

**F.Y. B.A. Course code and titles as per NEP-2020 w.e.f. 2024-25**

Abbreviations : {Th =Theory, Pr =Practical, DSC=Discipline Specific Course, DSE= Discipline Specific Elective, MIN =Minor, GE =Generic Elective, OE =Open Elective, AEC = Ability Enhancement Course, RM =Research Methodology, SEC =Skill Enhancement Course, VSC =Vocational Skill Course, VSEC =Vocational Skill Enhancement Course, ES=Environment Studies, CI = Constitution of India, CC = Co- Curricular, FP=Field Project, OJT=On Job Training, PW = Project Work. }

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून UGC व कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांच्या निर्देशानुसार नविन शैक्षणिक धोरण (NEP)-2020 लागू करण्यात आले आहे. सदर महाविद्यालयात कला शाखेचा तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम शिकविला जातो. नविन शैक्षणिक धोरण (NEP)-2020 नूसार अभ्यासक्रम,विषय निवड, परीक्षा पद्धती याबाबत सविस्तर माहित ही विद्यापीठाच्या वेबसाईट https://nmu.ac.in./Student-Corner/Academics/ Syllabi वर देण्यात आले आहे. अभ्यासक्रम व विषय निवड याबाबत विद्यापीठाच्या नियमानुसार बदल होऊ शकतो याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## F.Y.B.A. Sem - I

| Sr. No. | Subject | Course | Course Code | Paper Name |
|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | DSC | MAR-111 | Nivdak Khandeshi Kathancha Abhyas |
| 2 | Hindi | DSC | HIN-111 | Sahitya Sarita - I |
